महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

( सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५४ )

# महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१

( दिनांक १९ सप्टेंबर, २०११ पर्यंत सुधारीत)

( Maharashtra Act No. LIV of 1981 )

# The Maharashtra Marine Fishing Regulation Act, 1981

(As modified up to 19 Sept., 2011)

*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर, यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित.
२००६

[ किंमत : रुपये ]

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५४

# महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१

## अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे पृष्ठे

प्रकरण एक

**प्रारंभिक**


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | १ |
| २. | व्याख्या. | १ |
| ३. | सल्लागार समित्यांची रचना. | २ |


प्रकरण दोन

**मासेमारीचे नियमन**


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ४. | विनिर्दिष्ट क्षेत्रात मासेमारीच्या विवक्षित कामांचे नियमन करण्याचा, त्यावर निर्बंध घालण्याचा किंवा त्यास मनाई करण्याचा अधिकार. | ३ |
| ५. | कलम ४ अन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशचा भंग करुन मासेमारी गलबत वापरण्यास मनाई असणे. | ३ |
| ६. | मासेमारी गलबतांना लायसन देणे. | ४ |
| ७. | लायसन न मिळालेली मासेमारी गलबते वापरण्यास मनाई असणे. | ४ |
| ८. | लायसन रद्द करणे, निलंबित करणे आणि त्यात सुधारणा करणे. | ४ |
| ९. | गलबताची नोंदणी. | ५ |
| १०. | मासेमारी गलबताच्या हालचालीसंबंधी नोंदणी अधिका-याला द्यावयाची माहिती आणि त्याची परवानगी मिळविणे. | ५ |
| ११. | नोंदणीकृत मासेमारी गलबतांच्या मालकांनी द्यावयाची विवरणे. | ६ |
| १२. | कलमे ६, ८ व ९ खालील आदेशांची अंतिमता. | ६ |
| १३. | लायसन मंजूर करणे किंवा नोंदणी करणे, इत्यादीस नकार देणा-या आदेशांविरुद्ध अपिले. | ६ |


प्रकरण तीन

**शास्ती**


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १४. | मासेमारी गलबतांत प्रवेश करण्याचे आणि त्याची झडती घेण्याचे अधिकार. | ६ |
| १५. | जप्त केलेल्या मासळीची विल्हेवाट. | ७ |
| १६. | अभिनिर्णय. | ७ |
| १७. | शास्ती लादणे. | ७ |

## अनुक्रमणिका-चालू

**कलमे** **पृष्ठे**


| | | |
|---|---|---|
| १८. | अपील मंडळाची रचना व अपील मंडळाकडे करावयाची अपिले. .. .. | ८ |
| १९. | अपील मंडळाकडून पुनर्विलोकन. .. .. .. .. .. | ८ |
| २०. | या अधिनियमाद्वारे चौकशी करण्यासंबंधातील अभिनिर्णय अधिका-याचे व अपील मंडळाचे अधिकार. | ९ |
| २१. | गुन्ह्याबद्दलच्या शिक्षेबाबत सर्वसाधारण तरतूद. .. .. .. .. | ९ |
| २२. | कंपन्यांनी केलेले अपराध. .. .. .. .. .. | ९ |


प्रकरण चार

**किरकोळ**


| | | |
|---|---|---|
| २३. | सूट. .. .. .. .. .. | १० |
| २४. | सद्‌भावनापूर्वक केलेल्या कृत्यांचे संरक्षण. .. .. .. .. | १० |
| २५. | नियम करण्याचा अधिकार. .. .. .. .. .. | १० |
| २६. | व्यावृत्ती. .. .. .. .. .. | १० |

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५४ [१]

# महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१

[राज्यपाल यांची दिनांक १९ सप्टेंबर, १९८१ रोजी अनुमती मिळाल्यानंतर, महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग चार, असाधारण मध्ये दिनांक २३ सप्टेंबर, १९८१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

**महाराष्ट्र राज्याच्या किनारपट्टीलगतच्या समुद्रात, मासेमारी गलबतांतून होणा-या मासेमारीचे नियमन करण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्याच्या किनारपट्टीवरील समुद्रात मासेमारी गलबतांतून होणा-या मासेमारीचे नियमन करण्यासाठी व त्याच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींसाठी तरतुद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बत्तिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

## प्रारंभिक

**संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास (क्षेत्रीय जलधी धरुन) लागू आहे.

(३) तो, राज्य शासन, **शासकिय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमील, अशा तारखेस अंमलात येईल.

**व्याख्या**

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "अभिनिर्णय अधिकारी" म्हणजे' अधिकारिता असणारा तहसिलदार आणि त्यामध्ये राज्य शासनाने, **शासकिय राजपत्रातील,** अधिसूचनेद्वारे, तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी, तहसीलदारापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा, महसूल विभागाच्या ज्या इतर कोणत्याही अधिका-यास या अधिनियमाद्वारे, अभिनिर्णय अधिका-याला दिलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्यावर सोपविलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी, प्राधिकृत केले असेल अशा अधिका-याचा समावेश होईल ;

(ब) "अपील मंडळ" म्हणजे' कलम १८ खाली रचना केलेले अपील मंडळ ;

(क) "अंमलबजावणी अधिकारी" याचा अर्थ अधिकारीता असणारा, सहायक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, आणि त्यामध्ये राज्य शासनाने, **शासकिय राजपत्रातील,** अधिसूचनेद्वारे, तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी, सहायक मत्स्यव्यवसाय विकास अधिका-यापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा, मत्स्यव्यवसाय संचालनालयाच्या ज्या इतर कोणत्याही अधिका-यास, या अधिनियमाद्वारे अंमलबजावणी अधिका-याला दिलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्यावर सोपविलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी, प्राधिकृत केले असेल अशा अधिका-याचा समावेश होईल ;

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, १९८१, भाग ५, पृ.५९१ (इंग्रजी) पहा.

(ड) " मासेमारी गलबत " म्हणजे, नफ्यासाठी सागरामध्ये मासेमारीचे काम करणारी होडी किंवा जहाज, असा आहे. मग त्याच्या गतीसाठी त्याला यांत्रीक साधन लावलेले असो किंवा नसो—आणि " मासेमारी गलबत" या शब्दप्रयोगात पुढील गोष्टींचा समावेश होईल :—

नफ्यासाठी सागरामध्ये मासेमारी करणारी,—

(एक) होडी, आणि

(दोन) मचवा ;

(ई) " अनुज्ञापन अधिकारी " म्हणजे, अधिकारिता असणारा सहायक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी असा आहे आणि त्यामध्ये, राज्य शासनाने, **शासकिय राजपत्रातील,** अधिसूचनेद्वारे, तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी, साहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिका-यापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा, मत्स्यव्यवसाय संचालनालयाच्या ज्या इतर कोण्त्याही अधिका-यास, या अधिनियमाद्वारे, लायसन देणा-या अधिका-याला दिलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्यावर सोपविलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्राधिकृत केले असेल, अशा अधिका-यांचा समावेश होईल ;

(फ) " बंदर " म्हणजे, राज्य शासन, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी **राजपत्रातील,** अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी निश्चित करील अशा हद्दीतील मोकळी जागा ;

(ग) " विहित " म्हणजे, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे, विहित ;

(ह) " नोंदणीकृत मासेमारी गलबत " म्हणजे, कलम ९ खाली नोंदणी केलेले मासेमारी गलबत ;

(आय) " नोंदणी अधिकारी " म्हणजे, मुख्य बंदर अधिका-याने, कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्राकरिता, प्राधिकृत केलेला, राज्य बंदर संघटनेतील अधिकारी किंवा कर्मचारी आणि त्यामध्ये, राज्य शासनाने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी, राज्य बंदर संघटनेच्या ज्या कोणत्याही अधिका-यास, या अधिनियमाद्वारे, नोंदणी अधिका-याला दिलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्यावर लादलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी, प्राधिकृत केले असेल अशा इतर कोणत्याही अधिका-याचा समावेश होईल ;

(जे) " विनिर्दिष्ट क्षेत्र" म्हणजे, राज्य शासन, **शासकिय राजपत्रातील,** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे, राज्याचा संपूर्ण किनारपट्टीला लागून असलेल्या समुद्रातील परंतु क्षेत्रीय जलधीपलीकडे नसेल असे क्षेत्र;

(के) " राज्य" म्हणजे, महाराष्ट्र राज्य आणि त्यामध्ये, त्या राज्याच्या संपूर्ण किनारपट्टीला लागून असलेल्या क्षेत्रीय जलधीचा समावेश होईल ;

**सल्लागार समित्यांची रचना.**

**३.** (१) राज्य शासनास आदेशाद्वारे, प्रत्येक किनारी जिल्ह्यासाठी एका सल्लागार समितीची रचना करता येईल. जिल्हा दंडाधिकारी हा या समितीचा सभापती असेल आणि त्या जिल्ह्याचा सहाय्यक संचालक, मत्स्यव्यवसाय हा, सदस्य-सचिव असेल आणि राज्य बंदर विभाग व पोलीस विभाग यांचे प्रतिनिधी हे सदस्य असतील. सभापतीला, योग्य वाटेल त्याप्रमाणे तो, शासकी य विभागांचे आणि मच्छीमारांचे व त्या व्यवयासाचे प्रतिनिधी, स्वीकृत करुन घेईल. ही समिती, प्रकरण दोन खाली अंमलात आणावयाच्या विनिमयांची राज्य शासनाकडे शिफारस करील.

(२) समितीने अधिनियम अंमलात आणताना विचारार्थ पुढे येतील अशा पुढील प्रश्नांबाबत राज्य-शासनाला सल्ला दिला पाहिजे —

(एक) विनिर्दिष्ट प्रकारच्या गलबतांच्या सहाय्याने मासेमारी करण्यासाठी समुद्राची विनिर्दिष्ट क्षेत्र राखून ठेवणे ;

(दोन) कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रात मासेमारी करण्यास एका किंवा अनेक विनिर्दिष्ट प्रकारांच्या गलबतांना मनाई करणे;

(तीन) विनिर्दिष्ट क्षेत्रात मासेमारी करण्याची परवानगी द्यावयाच्या विनिर्दिष्ट प्रकारांच्या मासेमारी गलबतांना कमाल संख्या निश्चित करणे;

(चार) जिल्ह्यातील प्रत्येक बंदरामध्ये नोंदणी करावयाच्या विनिर्दिष्ट प्रकारांच्या मासेमारी गलबतांची कमाल संख्या निश्चित करणे;

(पाच) कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रात, विनिर्दिष्ट जातीचे मासे पकडण्याचे विनियमन करणे किंवा त्यास मनाई करणे ;

(सहा) विनिर्दिष्ट क्षेत्रात, विनिर्दिष्ट मासेमारी सामग्रीचे विनियमन करणे किंवा तीस मनाई करणे;

(सात) आवश्यक असेल त्या बाबतीत, मासेमारीच्या वेळा विहित करणे;

(आठ) ज्यामुळे अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी प्रभावीरीत्या करणे सुलभ होईल अशा कोणत्याही अन्य बाबी.

प्रकरण दोन

## मासेमारीचे नियमन

**विनिर्दिष्ट क्षेत्रात मासेमारीच्या विवक्षित कामांचे नियमन करण्याचा त्यांवर निर्बंध घालण्याचा किंवा त्यास मनाई करण्याचा अधिकार.**

**४.** (१) राज्य शासनास, पोट-कलम (२) मध्ये निर्देशिलेल्या बाबी लक्षात घेऊन आणि सल्लागार समितीशी विचारविनिमय केल्यानंतर, **शासकिय राजपत्रात,** अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे पुढील बाबींचे विनियमन करता येईल, त्यांवर निर्बंध घालता येतील किंवा त्यांना मनाई करता येईल,—

(अ) विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा एका किंवा अनेक वर्गाच्या मासेमारी गलबतांच्या सहाय्याने, कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रात, मासेमारी करणे ; किंवा

(ब) कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रात, मासेमारीसाठी वापरण्यात येतील अशा मासेमारी गलबतांची संख्या ; किंवा.

(क) आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा जातींचे मासे कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रात विनिर्दिष्ट मुदतीत पकडणे ; किंवा

(ड) विहित करण्यात येईल अशी मासेमारी सामग्री कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रात वापरणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये एखादा आदेश काढताना, राज्य शासनाने, पुढील बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत—

(अ) मासेमारीचा व्यवसाय करणा-या निरनिराळ्या वर्गातील व्यक्तींच्या आणि विशेषतः होडी किंवा मचवा यासारखी मासेमारीची पारंपरिक होडी वापरुन मासेमारीचा व्यवसाय करणा-या व्यक्तींच्या हितसंबंधाची जपणूक करण्याची गरज ;

(ब) शास्त्रीय तत्त्वावर मासळी जतन करण्याची व मासेमारीचे विनियमन करण्याची गरज ;

(क) समुद्रावर कायदा व सुव्यवस्था राखण्याची गरज ;

(ड) विहित करण्यात येईल अशी कोणतीही अन्य बाब.

**कलम ४ अन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाचा भंग करून मासेमारी गलबत वापरण्यास मनाई असणे.**

**५.** मासेमारी गलबताच्या कोणत्याही मालकाने किंवा कप्तानाने, असे मासेमारी गलबत, कलम ४ अन्वये काढलेल्या एखाद्या आदेशाचा भंग होईल अशा कोणत्याही रीतीने, मासेमारीसाठी वापरता कामा नये, किंवा त्याचा तसा वापर करु देता कामा नये, किंवा त्याचा तसा वापर करण्यास परवानगी देता कामा नये :

परंतु, अशा आदेशातील कोणत्याही गोष्टींचा कोणत्याही मासेमारी गलबताला, अशा अन्य क्षेत्रात मासेमारीच्या प्रयोजनासाठी किंवा अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट क्षेत्राव्यतिरिक्त, किना-याकडून कोणत्याही अन्य क्षेत्राकडे किंवा अशा अन्य क्षेत्राकडून किना-याकडे कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रामधून ये-जा करण्यास प्रतिबंध होतो असा अर्थ लावला जाणार नाही :

परंतु आणखी असे की, कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रामधून अशा मासेमारी गलबताच्या जाण्यायेण्यामुळे होडी किंवा मचवा यासारख्या कोणत्याही पारंपरिक मासेमारी गलबताच्या सहाय्याने विनिर्दिष्ट क्षेत्रात मासेमारी करीत असेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या मालकीच्या कोणत्याही मासेमारी जाळ्यांचे किंवा दोरांचे कोणत्याही रीतीने, कोणतेही नुकसान करता कामा नये.

**मासेमारी गलबतांना लायसन देणे.**

**६.** (१) मासेमारी गलबताच्या मालकास, कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रात मासेमारीसाठी अशा मासेमारी गलबताच्या वापर करण्यासाठी लायसन मिळण्याकरिता अनुज्ञापन अधिका-याकडे अर्ज करता येईल.

(२) पोट-कलम (१) खालील प्रत्येक अर्जाचा नमुना, त्यातील तपशील व त्यासोबत द्यावयाची फी ही, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(३) लायसन अधिका-यास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर व पोट-कलम (४) मध्ये निर्देशिलेल्या बाबी लक्षात घेऊन, अशा लायसनमध्ये नमूद केलेल्या एका किंवा अनेक विनिर्दिष्ट क्षेत्रांमध्ये मासेमारी करण्यासाठी अशा मासेमारी गलबताचा वापर करण्याकरिता मासेमारी गलबताच्या मालकाला एकतर लायसन देता येईल किंवा लायसन देण्यास नकार देता येईल ;

परंतु, लायसन देण्यास नकार देणारा कोणताही आदेश काढण्यापूर्वी, अनुज्ञापन अधिका-याने अर्जदाराला त्याची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिली पाहिजे.

(४) पोट-कलम (३) अन्वये लायसन देताना किंवा ते देण्यास नकार देताना, अनुज्ञापन अधिका-याने पुढील बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत—

(अ) मासेमारी गलबत हे नोंदलेले मासेमारी गलबत आहे किंवा कसे ;

(ब) मासेमारी गलबत, तसेच त्यावर बसविलेली उपसाधने आणि मासेमारी सामग्री यांची स्थिती ;

(क) कलम ४ अन्वये काढलेला कोणताही आदेश ;

(ड) विहित करण्यात येईल अशी कोणतीही अन्य बाब.

(५) या कलमान्वये मंजूर करण्यात आलेल्या लायसनचा नमुना व त्यासोबत फी देण्यासंबंधीच्या व शर्तीच्या यथोचित पालनादाखल प्रतिभूती देण्यासंबधीच्या शर्ती धरुन ज्या शर्तीस अधीन ठेवून उक्त लायसन देण्यात येईल त्या शर्ती, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील :

परंतु, मासेमारी गलबतांच्या वेगवेगळ्या वर्गासाठी द्यावयाच्या लायसनसंबंधात वेगवेगळी फी आणि प्रतिभूतीच्या मार्गाने मिळावयाच्या वेगवेगळया रकमा, विहित करता येतील.

(६) या कलमान्वये देण्यात आलेले लायसन हे, तीन वर्षांच्या मुदतीसाठी विधिग्राह्य असेल व त्याचे वेळोवेळी तत्सम मुदतीसाठी नवीकरण करता येईल.

**लायसन न मिळालेली मासेमारी गलबते वापरण्यास मनाई असणे.**

**७.** या अधिनियमाच्या प्रारंभानंतर कोणत्याही व्यक्तीने, ज्याला कलम ६ अन्वये लायसन मिळालेले नसेल अशा मासेमारी गलबताच्या वापर करुन, कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रात मासेमारी चालू ठेवता कामा नये :

परंतु, या कलमातील कोणतीही गोष्ट, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी ज्याचा मासेमारीसाठी वापर केला जात होता अशा कोणत्याही मासेमारी गलबताला, अशा प्रारंभापासून सहा महिन्यांच्या मुदतीसाठी किंवा राज्य शासन, **शासकिय राजपत्रातील,** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा अधिक मुदतीसाठी लागू होणार नाही.

**लायसन रद्द करणे, निलंबित करणे आणि त्यात सुधारणा करणे.**

**८.** (१) जर अनुज्ञापन अधिका-याची, एकतर, या बाबतीत त्याच्याकडे निर्देश करण्यात आल्यावरुन किंवा अन्यथा,–

(अ) कलम ६ अन्वये देण्यात आलेले लायसन, आवश्यक गोष्टींच्या बाबतीत विपर्यस्त माहिती देऊन मिळविण्यात आलेले आहे ; किंवा

(ब) लायसनधारकाने, ज्या शर्तीस अधीन राहून त्यास लायसन देण्यात आलेले आहे. त्या शर्तीचे पालन करण्यात, वाजवी कारणाशिवाय कसूर केली आहे किंवा त्याने, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतूदींचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही आदेशाचे किवा नियमाचे उल्लघंन केले आहे, याबद्दल अनुज्ञापन अधिका-याची खात्री झाल्यास लायसनधारक या अधिनियमान्वये ज्या

कोणत्याही अन्य शास्तीस पात्र होईल त्या शास्तीस बाध येऊ न देता, अनुज्ञापन अधिका-यास, लायसनधारकाला कारण दाखविण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, लायसन निलंबित किंवा रद्द करता येईल किंवा ज्या शर्तीच्या अधीन राहून लायसन देण्यात आले असेल त्या शर्तीच्या पालनादाखल प्रतिभूती दिलेली असल्यास त्या प्रतिभूतीची संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही भाग, समपहृत करता येईल.

(२) या बाबतीत करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांस अधीन राहून, लायसन अधिका-यास त्याबद्दलची कारणे नमूद करुन, कलम ६ अन्वये दिलेल्या लायसनमध्ये फेरफार किंवा सुधारणासुद्धा करता येईल.

**गलबताची नोंदणी.**

**९.** (१) मासेमारीच्या प्रयोजनासाठी वापरलेल्या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या आणि राज्यामध्ये ठेवलेल्या प्रत्येक गलबताच्या मालकाने, अशा गलबताची, या अधिनियमाखाली, नोंदणी केली पाहिजे.

(२) अशा गलबताच्या नोंदणीसाठी करावयाचा प्रत्येक अर्ज, त्याच्या मालकाकडून,—

(अ) तो अशा गलबताचा प्रथम मालक झाला असेल त्या तारखेपासून एक महिन्याचा कालावधी संपण्यापूर्वी ; किंवा

(ब) या अधिनियमाच्या प्रारंभापासून तीन महिन्याचा कालावधी संपण्यापूर्वी ;

यापैकी जी नंतरची असेल अशा मुदतीत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा फी सोबत, नोंदणी अधिका-याकडे, केला पाहिजे :

परंतु, नोंदणी अधिका-याला, लेखी नमूद करावयाच्या पुरेशा कारणांवरुन नोंदणीची कालमर्यादा, त्याला योग्य वाटेल अशा मुदतीपर्यंत, वाढविता येईल.

(३) नोंदणी अधिका-याने त्याने नोंदणी केलेल्या गलबताच्या मालकाला, विहित नमुन्यातील नोंदणी प्रमाणपत्र दिले पाहिजे आणि विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, त्याने ठेवावयाच्या नोंदवहीत अशा प्रमाणपत्राच्या तपशिलांची नोंद केली पाहिजे.

(४) एकदा करण्यात आलेली नोंदणी, नोंदणी अधिका-याकडून रद्द करण्यात येईपर्यंत, अंमलात असण्याचे चालू राहील.

(५) नोंदणी अधिका-याने, त्या गलबताला नेमून दिले असेल असे ' नोंदणी चिन्ह ', विहित रीतीने या कलमाखाली नोंदणी करण्यात आलेल्या प्रत्येक गलबतावर लावले पाहिजे.

(६) नोंदलेल्या मासेमारी गलबताखेरीज इतर कोणत्याही गलबताला कलम ६ खाली लायसन मिळणार नाही.

**मासेमारी गलबताच्या हालचालीसंबंधी नोंदणी अधिका-याला द्यावयाची माहिती आणि त्याची परवानगी मिळविणे.**

**१०.** (१) मासेमारी गलबताच्या प्रत्येक मालकाने गलबताच्या नोंदणीसाठी केलेल्या अर्जात त्याचे मूळ बंदर घोषित केले पाहिजे.

(२) एखाद्या विनिर्दिष्ट बंदरात गलबताची नोंदणी करण्यात आल्यानंतर, त्या गलबताच्या मालकाने, त्या बंदरामधूनच केवळ ते गलबत चालविले पाहिजे.

(३) गलबताच्या मालकाची, नोंदणी प्रमाणपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आले असेल त्या व्यतिरिक्त दुस-या एखाद्या बंदरामधून गलबत चालविण्याची इच्छा असेल तर त्याने बंदराचे नाव आणि त्या बंदरामधून ज्या कालावधीसाठी गलबत चालविण्यात येईल तो कालावधी स्पष्टपणे दर्शविणारा लेखी अर्ज, नोंदणी अधिका-याकडे केला पाहिजे. नोंदणी अधिका-याकडून लेखी परवानगी मिळवल्यानंतरच त्याला गलबत चालवण्याचे मूळ ठिकाण बदलता येईल. मालकाला एक महिन्याची नोटीस देऊन आणि कारण दाखवण्याची वाजवी संधी दिल्यानंतर परवानगी नाकारण्याचा किंवा दिलेली परवानगी रद्द करण्याचा हक्क नोंदणी अधिका-याकडे राखून ठेवलेला आहे. ज्याची दिलेली परवानगी रद्द करण्यात आली आहे. अशा गलबताच्या मालकाने, परवानगी रद्द करणारा आदेश मिळाल्यानंतर २४ तासांत, तात्पुरत्या बंदरावरून आपले गलबत हलवले पाहिजे.

**नोंदणीकृत मासेमारी गलबतांच्या मालकांनी द्यावयाची विवरणे.**

**११.** (१) प्रत्येक नोंदलेल्या मासेमारी गलबताच्या मालकाने, विहित करण्यात येतील अशी विवरणे, विहित वेळेत आणि विहित रीतीने, नोंदणी अधिका-याला दिली पाहिजेत.

(२) या कलमाखाली दिलेल्या कोणत्याही विवरणाच्या अचूकपणाची पडताळणी करण्यासाठी, नोंदणी अधिका-याला, कोणत्याही वेळी, कोणत्याही नोंदलेल्या मासेमारी गलबताची तपासणी करता येईल.

**कलमे ६, ८ व ९ खालील आदेशांची अंतिमता.**

**१२.** लायसन देणा-या अधिका-याचा किंवा नोंदणी अधिका-याचा कलम ६, कलम ८ किंवा कलम ९ खालील, यथास्थिति, मासेमारी गलबतास लायसन देणारा किंवा लायसन देण्यास नकार किंवा असे लायसन किंवा नोंदणी निलंबित करणारा, रद्द करणारा, त्यात फेरबदल किंवा सुधारणा करणारा किंवा गलबताची नोंदणी करणारा प्रत्येक निर्णय हा, कलम १३ खालील अपील करण्याच्या कोणत्याही हक्कास अधीन राहून अंतिम असेल.

**लायसन मंजूर करणे किंवा नोंदणी करणे, इत्यादीस नकार देणा-या आदेशांविरुद्ध अपिले.**

**१३.** (१) लायसन देणा-या अधिका-याला मासेमारी गलबतास लायसन देण्यास नकार देणा-या किंवा असे लायसन निलंबित करणा-या, रद्द करणा-या किंवा त्यात फेरबदल किंवा सुधारणा करणा-या आदेशामुळे किंवा मासेमारी गलबताची नोंदणी करण्यास नकार देणा-या किंवा अशा गलबताची नोंदणी रद्द करणा-या नोंदणी अधिका-याच्या आदेशामुळे, व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला तिला आदेश कळविण्यात आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, अपील प्राधिका-याकडे म्हणजे–राज्य बंदर संघटनेच्या मुख्य बंदर अधिका-याकडे—अपील करता येईल.

परंतु, अपीलकारास पुरेशा कारणामुळे वेळेत अपील दाखल करता आले नाही, याबद्दल अपील प्राधिका-याचे समाधान झाले तर, उक्त तीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतरही त्यास अपील दाखल करुन घेता येईल.

(२) पोट-कलम, (१) खालील अपील मिळाल्यानंतर, अपीलकाराला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, अपील प्राधिका-याने, शक्य तेवढ्या लवकर त्याबाबत त्याला योग्य वाटतील असे आदेश दिले पाहिजेत.

(३) अपील प्राधिका-याने या कलमाखाली दिलेला प्रत्येक आदेश अंतिम असेल.

प्रकरण तीन

## शास्ती

**मासेमारी गलबतात प्रवेश करण्याचे आणि त्याची झडती घेण्याचे अधिकार.**

**१४.** कोणतेही मासेमारी गलबत, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचा किंवा त्याखाली काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचा किंवा करण्यात आलेल्या नियमाचा किंवा लायसनच्या कोणत्याही शर्तीचा भंग करुन, वापरण्यात येत आहे किंवा वापरण्यात आले आहे असे कोणत्याही अंमलबजावणी अधिका-यास सकारण वाटेल तर, त्यास, अशा गलबतामध्ये प्रवेश करता येईल आणि त्याची झडती घेता येईल आणि असे गलबत अवरुद्ध करता येईल आणि त्यात सापडलेली अशी कोणतीही मासळी जप्त करता येईल.

**१५.** कलम १४ मध्ये निर्दिष्ट केलेला अंमलबजावणी अधिका-याने, विहित करण्यात येईल अशा ठिकाणी आणि अशा रीतीने, मासेमारी गलबत अवरुद्ध करुन ठेवले पाहिजे. **जप्त केलेल्या मासळीची विल्हेवाट.**

(२) साठवण्यासाठीच्या पुरेशा सोयींच्या अभावी, जप्त केलेल्या मासळीची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे असे अंमलाबजावणी अधिका-याचे मत होईल तर त्याला, अशा मासळीची विल्हेवाट लावता येईल आणि त्याने तिचे उत्पन्न, अभिनिर्णय अधिका-याच्या कार्यालयात, विहित रितीने जमा केले पाहिजे.

**१६.** (१) कोणतेही मासेमारी गलबत, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचा किंवा त्याखाली काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचा किंवा करण्यात आलेल्या नियमाचा किंवा लायसनच्या कोणत्याही शर्तीचा भंग करुन वापरण्यात येत आहे किंवा वापरण्यात आले आहे असे कोणत्याही अंमलबजावणी अधिका-यास सकारण वाटेल, त्याबाबतीत त्याने अभिनिर्णय अधिका-याकडे त्याबाबत प्रतिवृत्त दिले पाहिजे. **अभिनिर्णय.**

(२) अभिनिर्णय अधिका-याने, प्रतिवृत्तात नमूद करण्यात आलेल्या बाबींच्या संबंधात, संबंधित सर्व व्यक्तींना आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्या बाबींची विहीत रीतीने चौकशी केली पाहिजे.

**१७.** (१) कलम १६ अन्वयेची चौकशी झाल्यानंतर, अभिनिर्णय अधिकारी, कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचा किंवा त्याखाली काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचा किंवा करण्यात आलेल्या नियमाचा किंवा लायसनच्या कोणत्याही शर्तींच्या भंग करुन, कोणत्याही मासेमारी गलबताचा वापर केला आहे किंवा ते वापरु दिले आहे किंवा वापरण्यास मुभा दिली आहे किंवा कसे याचा निर्णय करील. अशी व्यक्ती दोषी असल्याचे अभिनिर्णय अधिका-याला आढळून आल्यास अभिनिर्णय अधिका-याला, अशा व्यक्तीवर— **शास्ती लादणे.**

(अ) अंतर्भूत मासळीची किंमत एक हजार रुपये किंवा त्यापेक्षा कमी असेल तर पाच हजार रूपये ;

(ब) अंतर्भूत मासळीची किंमत एक हजार रुपयांपेक्षा अधिक असेल तर मासळीच्या किंमतीच्या पाच पट ;

(क) कोणतीही मासळी पकडण्यात आली नसेल अशी बाब धरून इतर कोणत्याही बाबतीत, पाच हजार रुपये ;

यापेक्षा अधिक होणार नाही इतक्या उक्त अधिका-याने दिलेल्या अभिनिर्णयाप्रमाणे असलेल्या दिल्याप्रमाणेच्या रकमेची लेखी आदेशाद्वारे, शास्ती लादता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये लादलेल्या कोणत्याही शास्तीची रक्कम, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, वसूल करण्यायोग्य असेल.

(३) पोट-कलम (१) अन्वये लादता येईल अशा कोणत्याही शास्तीशिवाय, अभिनिर्णय अधिका-यास असाही निर्देश देता येईल की,—

(अ) पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेल्या रीतीने जे मासेमारी गलबत वापरण्यात आले आहे, किंवा ते वापरु दिले आहे किंवा ते वापरण्यास मुभा दिली आहे त्या गलबताचे नोंदणी प्रमाणपत्र, किंवा ज्या लायसनच्या कोणत्याही शर्तीचा भंग झाला आहे , ते लायसन,

(एक) यथास्थिति रद्द करण्यात किंवा परत घेण्यात येईल, किंवा ;

(दोन) अभिनिर्णय अधिका-यास योग्य वाटेल इतक्या कालावधीसाठी निलंबित ठेवण्यात येईल ; किंवा;

(ब) कलम १४ अन्वये जे मासेमारी गलबत अवरुद्ध करुन ठेवण्यात आले असेल किंवा, यथास्थिति , जी मासळी जप्त करण्यात आली असेल ती राज्य शासनाकडे समपहृत होईल :

परंतु, अशा गलबताच्या मालकाचे किंवा त्या गलबतावर हक्क सांगणा-या कोणत्याही व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेतल्यावर, अभिनिर्णय अधिका-याची जर अशी खात्री झाली की, मालकाने किंवा अशा अन्य व्यक्तीने अशी कसूर होऊ नये, म्हणून योग्य ती काळजी घेतली होती, तर खंड (ब) अन्वये कोणतेही मासेमारी गलबत समपहृत केले जाणार नाही.

**अपील मंडळाची रचना व अपील मंडळाकडे करावयाची अपिले**

**१८** (१) जिल्हा दंडाधिका-याने, संपूर्ण जिल्ह्याकरिता प्रत्येक जिल्ह्यात, एक अपील मंडळ स्थापन केले पाहिजे.

(२) राज्य शासनास आवश्यक वाटेल त्या त्या वेळी, **शासकिय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, जिल्ह्यातील तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी, एक सदस्य मिळून होणारे, एक वा अनेक अपील मंडळ वा मंडळे स्थापना करता येतील.

(३) अभिनिर्णय अधिका-याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, तो आदेश काढण्यात आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, त्या आदेशावरील अपिलाची सुनावणी करण्याची अधिकारिता असणा-या अपील मंडळाकडे अपील सादर करता येईल :

परंतु अपीलकर्त्याला वेळेच्या आत अपील दाखल न करण्याबद्दल पुरेसे कारण होते अशी जर अपील मंडळाची खात्री झाली तर, अपील मंडळाला, उक्त तीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतर परंतु अपरोक्त दिनांकापासून साठ दिवसांच्या कालावधी संपण्यापूर्वी कोणतेही अपील दाखल करुन घेता येईल.

(४) अपीलकर्त्याने अपील दाखल करतेवेळी त्या आदेशाविरूद्ध अपील केलेले असेल त्या आदेशान्वये देय असलेली शास्तीची रक्कम नसल्यास, या कलमान्वयेचे कोणतेही अपील, अपील मंडळाकडून दाखल करुन घेतले जाता कामा नये ;

परंतु, अपीलकर्त्याने या संदर्भात अर्ज केल्यावर, अपील मंडळाचे जर असे मत झाले की, या पोट-कलमानुसार भरावयाच्या अनामत रकमेमुळे अपीलकर्त्याला अवाजवी त्रास सहन करावा लागणार आहे, तर लेखी आदेशांद्वारे एकतर बिनशर्त किंवा त्यास लादण्यास योग्य वाटतील अशा शर्तीस अधीन ठेवून अशी रक्कम भरणे आवश्यक नसल्याचे अपील मंडळास जाहीर करता येईल.

(५) पोट-कलम (४) खालील शास्तीच्या रुपाने भरण्यात आलेली रक्कम, जर अपील मंडळास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, आणि संबंधित पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, ज्या आदेशाविरुद्ध ते अपील असेल तो आदेश कायम करता येईल, त्यात फेरफार करता येतील किंवा तो रद्द करता येईल आणि अपील मंडळाचा निर्णय अंतिम असेल ; आणि

(अ) पोट-कलम (४) खालील शास्तीच्या रुपाने भरण्यात आलेली रक्कम, जर अपील मंडळाने निदेश दिलेल्या शास्तीच्या रकमेहून अधिक असेल तर, ती जादा रक्कम किंवा ;

(ब) अपील मंडळाने शास्ती लादणारा आदेश रद्द केल्यास, शास्तीच्या रुपाने भरण्यात आलेली संपूर्ण रक्कम,

अपीलकर्त्याला परत केली पाहिजे.

**अपील मंडळाकडून पुनर्विलोकन.**

**१९.** अभिनिर्णय अधिका-याने कलम १७ अन्वये काढलेल्या व कलम १८ अन्वये ज्यांच्याविरुद्ध एकही अपील दाखल करण्यात आले नसेल अशा कोणत्याही आदेशाच्या कायदेशीरपणाबाबत वा औचित्याबाबत किंवा कार्यपद्धतीच्या नियमिततेबाबत स्वतःची खात्री करुन घेण्याच्या प्रयोजनाकरिता आणि अपील मंडळास, अशा आदेशाच्या अभिलेखाच्या तपासणीची मागणी करता येईल आणि त्या संबंधात त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल :

परंतु, असा कोणताही आदेश, त्या आदेशाचा परिणाम झालेल्या व्यक्तीला त्याबाबतीत आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, काढण्यात येता कामा नये.

१९०८ चा ५. **२०.** (१) अभिनिर्णय अधिकारी व अपील मंडळ यांना, खटल्याची न्यायचौकशी करतेवेळी, पुढील बाबतीत, दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार दिवाणी न्यायालयाला, असलेले सर्व अधिकार असतीलः— **या अधिनियमान्वये चौकशी करण्या-संबंधातील अभिनिर्णय अधिका-याचे व अपील मंडळाचे अधिकार.**

(अ) साक्षीदारांना हजर राहण्यास फर्माविणे व त्यांना हजर राहण्यास भाग पाडणे आणि त्यांची शपथेवर तपासणी करणे ;

(ब) कोणताही दस्तऐवज शोधून काढण्यास व तो सादर करण्यास भाग पाडणे ;

(क) शपथपत्राच्या आधारावर पुरावा स्वीकारणे ;

(ड) कोणत्याही न्यायालयामधून किंवा कार्यालयामधून कोणताही सरकारी अभिलेख किंवा त्याची प्रत मागवणे ;

(ई) साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी राजादेश काढणे ;

(फ) विहीत करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(२) अभिनिर्णय अधिकारी किंवा अपील मंडळ, या अधिनियमाखाली कोणत्याही अधिकारांचा वापर करीत असताना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ची कलमे ३४५ व ३४६ च्या प्रयोजनार्थ, दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल. **१९७४ चा २.**

**२१.** या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी किंवा त्या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही आदेशाचे वा नियमाचे अथवा लायसनच्या कोणत्याही शर्तीचे जो कोणी उल्लंघन करील त्यास, या अधिनियमाखाली त्याच्याविरुद्ध करण्यात येईल अशा अन्य कोणत्याही कारवाईला बाध न येऊ देता अपराधसिद्धीनंतर, एक हजार रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल आणि अशा प्रथम अपराधसिद्धीनंतर जितके दिवस असे उल्लंघन करणे चालू राहील त्या प्रत्येक दिवसाकरिता पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या आणखी दंडाची शिक्षा होईल. **गुन्ह्याबद्दलच्या शिक्षेबाबत सर्वसाधारण तरतुद.**

**२२.** (१) जेव्हा या अधिनियमाखालील एखादा अपराध एखाद्या कंपनीने केला असेल तेव्हा, तो अपराध घडला त्यावेळी त्या कंपनीचे कामकाज चालवण्याबाबत त्या कंपनीची प्रभारी असलेली व कंपनीला जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती, तसेच कंपनी ही, त्या अपराधाबाबत दोषी असल्याचे समजण्यात येईल आणि त्यानुसार ती कार्यवाही केली जाण्यास व शिक्षा होण्यास पात्र ठरेल : **कंपन्यांनी केलेले अपराध.**

परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीने जर, तिच्या नकळत तो अपराध घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने, सर्वतोपरी, दक्षता घेतली होती असे सिद्ध केले तर, या पोट-कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि त्या कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी याच्या संमतीने किंवा त्याच्या मूकसंमतीने किंवा त्याच्या हयगयीमुळे तो अपराध घडला आहे असे सिद्ध करण्यात येईल त्याबाबतीत, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी त्या अपराधबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल त्याबाबतीत असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार तो, त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व शिक्षेस पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(अ) " कंपनी " म्हणजे, कोणताही निगम निकाय आणि त्यात, भागीदारी संस्था किंवा व्यक्तींचा अन्य संघ यांचा समावेश होतो ; आणि

(ब) भागीदारी संस्थेचा संबंधात " संचालक " म्हणजे, त्या भागीदारी संस्थेतील भागीदार.

प्रकरण चार

## किरकोळ

**सूट.** **२३.** (१) केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या किंवा कोणत्याही सार्वजनिक उपक्रमाच्या मालकीच्या सर्वेक्षण गलबतांना, या अधिनियमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

(२) जर राज्य शासनाचे असे मत झाले की, या अधिनियमाची प्रयोजने लक्षात घेऊन, कोणत्याही एका किंवा अनेक विनिर्दिष्ट क्षेत्रांत मासेमारीसाठी वापरल्या जाणा-या मासेमारी गलबतांच्या कोणत्याही एका किंवा अनेक वर्गास, या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी लागू करणे सार्वजनिक हिताचे ठरणार नाही. तर, त्यास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्यास लादण्यास योग्य वाटतील अशा शर्तीस अधीन ठेवून, अशा एका किंवा अनेक विनिर्दिष्ट क्षेत्रांत मासेमारीसाठी वापरल्या जाणा-या मासेमारी गलबतांच्या एका किंवा अनेक वर्गास, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा एका किंवा अनेक कालावधींसाठी या अधिनियमाच्या, सर्व किंवा कोणत्याही तरतुदींच्या अंमलबजावणीतून सूट देता येईल.

**सद्‌भावपूर्वक केलेल्या कृत्यांचे संरक्षण.** **२४** (१) या अधिनियमानुसार किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही आदेशानुसार किंवा नियमानुसार सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा इरादा आहे अशा कोणत्याही कृत्या बद्दल, शासनाविरुद्ध किंवा कोणत्याही अधिका-याविरूद्ध किंवा प्राधिका-यांविरूद्ध, कोणताही खटला, दावा किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

(२) या अधिनियमानुसार किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही आदेशानुसार किंवा नियमानुसार सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याही कृत्यामुळे कोणतेही नुकसान झाल्यास किंवा नुकसान होण्याचा संभव असल्यास, शासनाविरुद्ध किंवा कोणत्याही अधिका-याविरुद्ध किंवा प्राधिका-याविरूद्ध, कोणताही खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**नियम करण्याचा अधिकार.** **२५** (१) या अधिनियमाखाली नियम करण्याचा अधिकार राज्य शासनाकडून वापरण्यात येईल.

(२) या अधिनियमात अन्यत्र अंतर्भूत असलेल्या,नियम करण्याच्या कोणत्याही अधिकारास बाध येऊ न देता या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी म्हणून राज्य शासनास या अधिनियमाशी सुसंगत असे नियम करता येतील.

(३) या अधिनियमान्वये केलेले सर्व नियम हे पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

(४) या अनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनांत, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा पूर्वोक्तप्रमाणे त्याच्या लगतनंतरची अधिवेशने समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास किंवा नियम करू नये म्हणून, दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून यथास्थिति अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येईल किंवा येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे या नियमान्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**व्यावृत्ती.** **२६.** क्षेत्रीय जलधीबाहेरील मासेमारीला आणि मत्स्यव्यवसायाला या अधिनियमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

शामुना–ए–२०१३–सभासंमरामुं–१–२०१२-६०४२ प्रती–पीसी ४*